# दि. ०५/०२/२०२४ रोजीचे सर्वसाधारण सभेतील प्रशासकीय ठरावाचा उतारा.

## (प्रशासकीय विषय)

**विषय क्रमांक १५९ : श्री.जुम्मा प्यारेवाले उपायुक्त (सा) यांना अमरावती महानगरपालिका अमरावती या पदावरुन कार्यमुक्त करण्याबाबत.**

**संदर्भ :**
1. शासन आदेश क्रं.एमसीओ-2023/प्रक्र.79/नवि-14 दि.17 एप्रिल 2023.
2. या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रं.अमनपा/आयुक्त/स्वी.स/154/2023,दि.20.11.2023
3. या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रं.अमनपा/आयुक्त/स्वी.स/169/2023, दि.06.12.2023
4. या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रं.अमनपा/आयुक्त/स्वी.स/192/2023, दि.19.1.2024.
5. या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रं.अमनपा/आयुक्त/स्वी.स/194/2023, दि.23.1.2024.
6. आपले पत्र क्रं. अमनपा /स्वी.स./जा.क्रं./411/2024, दि.23.1.2024 प्राप्त दि.24.1.2024

**ठराव क्रमांक १५९-**

ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियम प्रकरण-४ कलम ४५ मधील तरतुदीनुसार शासनाद्वारे संदर्भ क्रं-१ अन्वये आपली, अमरावती महानगरपालिकेच्या उपायुक्त या पदावर श्री. जुम्मा प्यारेवाले यांची बदलीने पदस्थापना करण्यात आली होती.

आणि ज्याअर्थी, अधीनियमाचे कलम-४९ अन्वये उपायुक्तांचे अधीकार व कर्तव्य निश्चीत करण्यात आली आहेत. आणि ज्याअर्थी, अधीनियमाचे कलम-५० अन्वये सांविधानीक अधीका-यांच्या सेवेच्या शर्ती नमुद करण्यात आलेल्या आहेत. आणि ज्याअर्थी, शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेले आदेश व दिशानिर्देश तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा मधील तरतुदीनुसार आयुक्तांनी वेळोवेळी सोपविलेली कामे पार पाडने त्यांना बंधनकारक आहेत.

आणि ज्याअर्थी, श्री.जुम्मा प्यारेवाले उपायुक्त (सा) यांना वेळोवेळी सोपविण्यात आलेल्या महानगरपालिका स्तरावरील कामांमधे कसुर करण्यात आला आहे, आणि ज्याअर्थी, त्यांना वेळोवेळी सोपविण्यात आलेल्या शासन स्तरावरील कामांमधे कसुर करण्यात आला आहे, आणी ज्याअर्थी, विद्यमान शासनाचे विरोधात त्यांचे व्दारे खुलेआम वक्तव्ये केली आहेत व त्यासंदर्भातील बातमी माध्यमातुन वृत्तपत्राच्या मुख्य पृष्ठावर आपल्या नावासह प्रकाशीत झाली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्रातील मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील कुटुंबाचे सर्व्हेक्षण, हा विद्यमान शासनाचा महत्वकांक्षी विषय असुन याबाबत शासनातर्फे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे व यासंदर्भातील महत्वपुर्ण श्री.जुम्मा प्यारेवाले उपायुक्त (सा) यांचेवर सोपविण्यात आली आहे व उपरोक्त विषयी सातत्याने शासन निर्देशाचे विरोधात त्यांनी भुमिका व्यक्त केली आहे व याबाबत पुर्णतः असहकार करुन त्यांनी शासन व प्रशासन विरोधातील भुमीका स्पष्ट केली आहे.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त नमुद सर्व बाबींच्या अनुषंगाने श्री.जुम्मा प्यारेवाले उपायुक्त (सा) यांची वर्तणुक, बेशीस्त, बेजबाबदारी, मनपाचे आर्थीक नुकसान करणे, मनपा व शासनाची प्रतीमा मलिन करणे इ. बाबत तसेच संदर्भ क्रं-२,३,४ अन्वये वेळोवेळी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती व विहीत मुदतीत लेखी खुलासा सादर करण्याचे निर्देशीत करण्यात आले होते तथापी त्यांचेव्दारे त्यासंदर्भातील खुलासा सादर केलेला नाही, तसेच संदर्भ क्रं-५ अन्वये त्यांना दिलेल्या कारणे दाखवा नोटीस च्या अनुषंगाने त्यांनी दिलेला खुलासा समर्पक नाही असे मा.आयुक्त यांचे माझे मत झाले आहे.

त्याअर्थी, सर्व बाबी पाहता आपली अमरावती महानगरपालिकामध्ये काम करण्याची त्यांची मानसिकता दिसुन येत नाही तसेच त्यांची वर्तणुक नकारात्मक स्वरुपाची असुन मनपाचे आर्थीक नुकसान करणारी, बेशीस्तीची व जनमानसात मनपाची तसेच शासनाची प्रतीमा मलीन करणारी व उपद्रव् मुल्ययुक्त असल्याने, उपरोक्त नमुद सर्व बाबी पाहता श्री. जुम्मा प्यारेवाले उपायुक्त (सामान्य) अमरावती महानगरपालिका, अमरावती यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम चे कलम-५० अन्वये उपायुक्त (सामान्य) अमरावती महानगरपालिका, अमरावती या पदावरुन कार्यमुक्त करुन त्यांच्या सेवा महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडे प्रत्यावर्तीत करण्याबाबतचा विषय मा. सर्वसाधारण सभेच्या मंजुरी करिता सादर. .

उपरोक्त प्रशासकीय विषय सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर करण्यात आला आहे. परंतु सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्वसाधारण सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा/-**
**नगरसचिव**
**महानगरपालिका, अमरावती**

**स्वा/**
**प्रशासक**
**महानगरपालिका, अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.